शासकीय/निमशासकीय कार्यालयात
विद्यमान मा. राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद
यांचे छायाचित्र प्रदर्शित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः राछाप्र-३३१७/ प्र.क्र.१८० /२९,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ११ सप्टेंबर, २०१७.

शासन निर्णय :-

विद्यमान मा. राष्ट्रपती तसेच मा. पंतप्रधान यांचे छायाचित्र शासकीय/निमशासकीय कार्यालयात लावण्याच्या संकेतानुसार मा. राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांचे शासनाने विहीत केलेल्या १६" X २०" आकाराचे रंगीत छायाचित्र मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री यांची दालने तसेच सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयांमधून लावण्यात यावे असे या अन्वये सुचित करण्यात येत आहे.

२. मा. राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांचे छायाचित्र मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय मुंबई / नागपूर / पुणे /औरंगाबाद / कोल्हापूर यांचेमार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहे. संबंधित विभाग/ कार्यालये यांनी संबंधित शासकीय मुद्रणालयाकडे संपर्क साधावा. शासकीय मुद्रणालयांनी मागणीनुसार छायाचित्राचा पुरवठा करावा.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार छायाचित्राची प्रत संबंधीत शासकीय मुद्रणालयातून प्राप्त करणेबाबत व छायाचित्राची चौकट (फ्रेम) करून कार्यालयांमधून प्रदर्शित करण्याबाबत सूचना द्याव्या. छायाचित्र व चौकट (फ्रेम) प्रित्यर्थचा खर्च संबंधीत शासकीय विभाग/कार्यालयांना मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागवावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१११५१७१०२८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chhaya Kiran Wadte

Digitally signed by Chhaya Kiran Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f311bd8712a7b94b3b73d0e88ad01cf3a49c098bcd5f62e16e7135388baa523c, serialNumber=5bac345149360802f8cd3e4ab4ec174f2fec1bff420e81931e638ee6cdfcc12d, cn=Chhaya Kiran Wadte
Date: 2017.09.11 15:09:29 +05'30'

(छा. कि. वडते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा .राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, मलबार हिल, मुंबई,

३. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई,
४. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. *महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
८. *प्रबंधक, मूळ न्याय शाखा ,उच्च न्यायालय ,मुंबई,
९. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०. *सचिव ,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
११. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१२. *प्रबंधक, लोक आयुक्त/उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६. वित्त विभाग, व्यय-४ (३प्रती) मंत्रालय, मुंबई,
१७. उद्योग, उर्जा व कामगार विभाग (३प्रती) मंत्रालय, मुंबई,
१८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
१९. महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई,
२०. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२ ,नागपूर,
२१. महालेखापाल, लेखापरीक्षा ,महाराष्ट्र-२, नागपूर,
२२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२३. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२४. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, मुंबई,
२५. व्यवस्थापक, मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई,
२६. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंक मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे,
२७. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार नागपूर,
२८. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री भांडार कोल्हापूर,
२९. सहा. संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार, औरंगाबाद,
३०. निवडनस्ती / साप्रवि-२९.